स्थापना १९३१

**SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY COLLEGE OF ARTS & SHREEMATI CHAMPABEN BHOGILAL COLLEGE OF COMMERCE & SCIENCE FOR WOMEN**
1, Nathibai Thackersey Road, Mumbai - 400 020.
**Phone:** 022 2209 3789, 022 2203 1879. **Extn.:** 1219 & 1220
www.sndtcollegemumbai.org
Email: collegemumbai@sndt.ac.in
**NAAC B+ Grade (With CGPA 2.68)**

## एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड एस.सी.बी. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सच्या हिन्दी व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने "लोक संगीत में फाग" कार्यक्रम संपन्न

दिनांक 24 जानेवारी 2023 रोजी एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड एस.सी.बी. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सच्या हिन्दी व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने "लोक संगीत में फाग" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्या डॉ. वंदना शर्मा यांनी 'संगीत नाटक अकॅडेमी द्वारे सन्मानित, मुंबई दूरदर्शनच्या भूतपूर्व डायरेक्टर व प्रोड्यूसर सन्माननीय सुश्री डॉ. शैलेष श्रीवास्तव' यांना आमंत्रित केले तसेच अतिथी कलाकाराचा सन्मान व परिचय करून दिला.

कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभागाच्या विद्यार्थिनींच्या 'धमार' गीत गायनाने झाली. या नंतर सुश्री डॉ. शैलेष श्रीवास्तव यांनी उत्तर प्रदेशचे लोकगीत 'फाग' या गीत प्रकारचे गायन अभ्यासपूर्ण विवेचनासहित केले. विविध विषयांवर आधारित फाग गीतांच्या रचनांमधून उत्तरप्रदेशात साजरा होणाऱ्या होळीच्या सणाची अनुभूति त्यांनी उपस्थितांना करून दिली. विद्यार्थिनींनी त्यांच्या गाण्यांना टाळ्यांचा ताल धरत साथ देऊन कार्यक्रमाची रंगत वाढविली.

साहित्य व संगीत यांची सांगड घालणाऱ्या या कार्यक्रमात हिन्दी व संगीत विभागाच्या 30 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. गायनसोबत हारमोनियम संगत संगीत विभागाच्या डॉ. विजल पटेल यांनी तर तबला संगत श्री. पवन कुमार आणि श्री. शंकर स्वामी यांनी केली. विभाग प्रमुख श्रीमती कल्पना जैन यांनी कार्यक्रमाचे उद्दीष्ट स्पष्ट करत सूत्रसंचालन केले. आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Scanned with OKEN Scanner



**Principal (Addl. Charge)**
S.N.D.T. College of Arts & SCB College of
Commerce & Science for Women
New Marine Lines, Mumbai - 400 020.

SNDT College of Arts & SCB College of Commerce & Science for Women ★
1, Nathibai
Thackersey
Road,
Mumbai-400 020.